नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २३/१०/२०२६ (शुक्रवार)

नागपूर ग्रामीण पोलीसांची अंमली पदार्थ विरोधात प्रभावी कारवाई; राज्यस्तरीय कामगिरी मुल्यांकनात जिल्हा पोलीस घटकांमध्ये राज्यात प्रथम स्थान प्राप्त

महाराष्ट्र राज्यात अंमली पदार्थ आणि नशेशी संबंधित अवैध व्यापाराला आळा घालण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (**ANTF**) द्वारे दिनांक ०१/०७/२०२६ ते ३०/०९/२०२६ या कालावधीसाठी जाहीर करण्यात आलेल्या परफॉर्मन्स मेझरेबल मॅट्रिक्स ऑफ नारकोटिक्स वर्क (**Performance Measurable Matrix of Narcotics Work**) च्या राज्यस्तरीय मुल्यांकनात मध्ये नागपूर ग्रामीण पोलीसांनी उत्कृष्ट कामगिरी करत ८० पैकी ६० गुण प्राप्त करत राज्यातील पोलीस घटकांच्या एकत्रित क्रमवारीत चौथे स्थान मिळविले आहे. या क्रमवारीत नागपूर ग्रामीणच्या पुढे ३ मोठी पोलीस आयुक्तालये असून, त्यांचे कार्यक्षेत्र आणि पोलीस घटकांचा व्याप तुलनेने मोठा आहे. विशेष म्हणजे, पोलीस आयुक्तालयांचे घटक वगळता पोलीस अधीक्षक कार्यालयांच्या जिल्हा घटकांमध्ये नागपूर ग्रामीणने राज्यात प्रथम स्थान प्राप्त केले आहे. अंमलीपदार्थ विरोधी राबविण्यात आलेल्या या मोहीमेत नागपुर ग्रामीण पोलीसांनी खालील प्रमाणे अतुलनिय कामगिरी केली आहे.

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार तसेच मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात अंमली पदार्थ तस्करी ,विक्री तसेच नशेविरोधात कठोर कारवाई केली जात आहे. नागपूर ग्रामीण पोलीसांनी दिनांक ०१/०७/२०२६ ते ३०/०९/२०२६ दरम्यान सदर मोहीमेअंतर्गत **NDPS** चे एकूण १४६ गुन्हे नोंदवले गेले. यामध्ये व्यावसायिक प्रमाणात अंमली पदार्थ बाळगणे(**Commercial Quantity**) या कारवाया सह सेवन करणाऱ्यांवर सुध्दा कारवाया करण्यात आल्या आहेत.


महाराष्ट्र राज्यात प्रथमच नागपूर ग्रामीण पोलीसांनी **PITNDPS** अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. अंमली पदार्थ व मन:प्रभावी पदार्थांच्या अवैध वाहतुकीस प्रतिबंध करणारा अधिनियम, १९८८ (**PREVENTION OF ILLICIT TRAFFIC IN NARCOTIC DRUGS AND PSYCHOTROPIC SUBSTANCES ACT, 1988) - PITNDPS Act** च्या संदर्भात दिनांक ०४/०९/२०२६ रोजी पारीत झालेल्या नवीन शासन निर्णयानुसार सदर अधिकार

विशेष पोलीस महानिरीक्षक यांना प्राप्त झाल्यानंतर, या अधिकाराचा वापर करीत दिनांक ०९/०९/२०२६ रोजी आरोपीविरूध्द स्थानबध्दतेचा आदेश परीत केला गेला.

तसेच अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी नागरिक व तरुणांमध्ये जनजागृती करण्यासाठी ४८६ जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या एकूण ६९२.२६९ किलोग्रॅम अंमली पदार्थांची नियमानुसार या मोहीमेदरम्यान सुरक्षित विल्हेवाट लावण्यात आली. जिल्हास्तरीय समन्वयासाठी जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात एकूण ३ **NCORD** बैठका यशस्वीपणे पार पाडल्या गेल्या.

याशिवाय, नागपुर ग्रामीण जिल्हयात सन २०२६ मध्ये आजपर्यंतच्या **NDPS** कायद्यांतर्गत एकूण ४८१ गुन्हे नोंदविण्यात आले असून, त्यामध्ये ५४० आरोपींचा समावेश आहे. यापैकी १० गुन्हयांमध्ये व्यावसायिक प्रमाणातील अंमली पदार्थ मिळुन आला आहे. अंमली पदार्थांविरोधातील कठोर कारवाईचा भाग म्हणून **PIT-NDPS** कायद्यांतर्गत १ स्थानबद्धता आदेश पारित करण्यात आला असून, **NDPS** गुन्ह्यांतील आरोपींविरुद्ध **MCOCA** अंतर्गत ३ टोळयांवर कारवाई करण्यात आली आहे. सन २०२५ च्या तुलनेत सन २०२६ मध्ये अंमली पदार्थांच्या जप्तीमध्ये लक्षणीय वाढ नोंदविण्यात आली आहे. गांजाच्या जप्तीमध्ये ९२५ टक्के अफूच्या जप्तीमध्ये ६३३ टक्के आणि एमडी या अंमली पदार्थाच्या जप्तीमध्ये १,८९४ टक्के वाढ झाली आहे. सन २०२६ मध्ये आजपर्यंत एकुण किंमती ५,३४,२२,६७७/— रूपयांचा (५ कोढी ३४ लाख २२ हजार ६७७ रूपये) मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सन २०२५ मध्ये किंमती ३३,२३,९९८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. मुद्देमाल किंमतीमध्ये १५०७ टक्के वाढ झाली आहे.

अंमली पदार्थांची तस्करी व अवैध व्यापाराविरुद्ध कठोर कारवाई करणे, युवकांना नशेच्या विळख्यापासून दूर ठेवणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. नागपूर ग्रामीण पोलीस जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधातील कारवाई आणि जनजागृती मोहीम आगामी काळातही सातत्याने सुरू ठेवण्यात येणार आहे.



नागपूर ग्रामीण पोलीसांची पाहिजे आरोपींचा शोध मोहीमेमध्ये प्रभावी कामगिरी राज्यातील पहिल्या पाच घटकांमध्ये स्थान प्राप्त

मा. पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार, नागपूर ग्रामीण पोलीस घटकातील अभिलेखांवरील पाहिजे आरोपींचा शोध घेण्यासाठी दिनांक ०१/१०/२०२६ ते ३१/१०/२०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान आतापर्यंत एकूण ६३ पाहिजे आरोपींचा शोध घेण्यात नागपूर ग्रामीण पोलिसांना यश आले असून, या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर नागपूर ग्रामीण पोलीस घटकाने राज्यातील पहिल्या पाच पोलीस घटकांमध्ये स्थान प्राप्त केले आहे. .

या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण पोलिसांतर्फे खालीलप्रमाणे विशेष नियोजन व कामगिरी करण्यात आली आहे

या मोहिमेसाठी श्री. मयंक माधव,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच विशेष पथकांची स्थापना करण्यात आली. पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा स्तरावर एकूण २५ शोध पथके स्थापन करण्यात आली आहेत. यामध्ये २३ पोलीस अधिकारी आणि ५५ पोलीस अंमलदार पूर्णवेळ कार्यरत असुन ते सात्यत्याने पाहीजे आरोपींचा शोध घेत आहे.

मोहिमेदरम्यान दिनांक १५/१०/२०२६ रोजी पर्यंत **५२ पाहीजे** आरोपींना शोधण्यात आले असुन आजपावेतो **६३ पाहीजे** आरोपींना शोधण्यात आले आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हयात गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी व कायदा–सुव्यवस्थेच्या दृष्टीने ही मोहीम अधिक तीव्रतेने राबवली जात आहे.

Top Five Units

अ. क्र.	घटक	मोहीम सुरू होण्यापुर्वी एकुण प्रलंबित पाहिजे आरोपी	मोहीमे दरम्यान अटक करण्यात आलेले पाहिजे आरोपी	टक्केवारी
१	नंदुरबार	६७९	९६	१४.१४ %
२	यवतमाळ	५७२	७७	१३.४६%
३	परभणी	१००१	१३२	१३.१९%
४	नागपुर ग्रामीण	४२३	५२	१२.२९%
५	सिंधुदुर्ग	७५	८	१०.६७%

अल्पवयीन बालीकेवर लैगिंक अत्याचार करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

पोलीस स्टेशन नरखेड :– फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन नरखेड येथे अप क्र. १८८/२०२२ कलम ३७६ (एबी), ३४२,४५१, ५०६ भादवि सहा कलम ४,६ पोक्सो सह कलम ३(१)(डब्ल्यु),३(२)(व्ही) अजाजअप्र अधि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक २५/०५/२०२२ रोजी यातील फिर्यादी ही कामानिमित्य घराबाहेर गेली होती त्यावेळी तिची ०७ वर्षाची मुलगी ही घरी हजर होती. यातील आरोपी नामे पोतन शामलाल चुरे, वय ५२ वर्षे, रा मोवाड, नरखेड याने फिर्यादीच्या ०७ वर्षीय मुलीला जबरदस्तीने ओढत त्याच्या घरात नेवुन तिचे वर लैंगिक अत्याचार केला.

सदर प्रकरणाचा प्राथमिक तपास श्रीमती सारीका गुरूकर, पोउपनि ,नरखेड यांनी केला असुन तपासी अधिकारी श्री नागेश जाधव, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांनी सदर

प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २३/१०/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं १२ जहीर अब्बास शेख यांनी नमुद आरोपी यास कलम ६ पोक्सो मध्ये २० वर्षे सश्रम कारावास व १०,०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास कलम ४५१ भादवि मध्ये २ वर्षे सश्रम कारावास व ५०००/— रूपये दंड , दंड न भरल्यास २महिने साधा कारावास कलम ३४२ भादवि मध्ये ६ महीने सश्रम कारावास व १ ००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री प्रशांत साखरे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा पोलीस निरीक्षक श्रीमती. मगंला मोकाशे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन नरखेड, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४ नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण ,पोहवा दिपाली ढोके ब. नं. १२६८ पोलीस स्टेशन नरखेड यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

हॉटेलमधून सोन्याच्या दागिन्यांची बॅग चोरी; उमरेड पोलीसांनी अवघ्या ३ तासांत गुन्हा उघडकीस आणत संपूर्ण मुद्देमाल केला हस्तगत

पोलीस स्टेशन उमरेड :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी उमरेड, नागपुर ग्रामीण यांच्या नेतृत्वात दिनांक २२/१०/२०२६ रोजी उमरेड येथील वाय—पॉईंट परिसरातील हरीओम व्हेजिटेरियन हॉटेलमधून सोन्याचे दागिने असलेली हॅन्डबॅग चोरी करणाऱ्या आरोपीचा उमरेड पोलिसांनी अवघ्या ३ तासांत शोध घेऊन चोरीचा गुन्हा उघडकीस आणला.

सदर गुन्हयातील फिर्यादी सौ. वैशाली पळीशालवार,रा. लक्ष्मीनगर, गडचिरोली या दिनांक २२/१०/२०२६ रोजी त्यांचे पतीसह गडचिरोली येथून नागपूर येथे जात असतांना दुपारी ११:३० ते १२:०० वाजताच्या दरम्यान उमरेड येथील वाय—पॉईंट परिसरातील हरीओम

व्हेजिटेरियन हॉटेलमध्ये जेवणासाठी थांबल्या होत्या. जेवणानंतर त्या सोन्याचे दागिने असलेली हॅन्डबॅग हॉटेलमध्येच विसरून पुढे गेल्या. बॅग विसरल्याचे लक्षात येताच त्या तातडीने परत आल्या; मात्र त्यांना बॅग आढळून आली नाही. सदर बॅगमध्ये सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याच्या २ बांगड्या व सोन्याचा लक्ष्मीहार असे एकूण ९,२०,०००/— रुपये किंमतीचे दागिने होते. सदर प्रकरणी उमरेड पोलीस स्टेशन येथे चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरीष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात उमरेड पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. अवघ्या ३ तासांत गुन्हा उघडकीस आणून संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केला. तपासादरम्यान पोलीसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता, फिर्यादी हॉटेलमधून निघून गेल्यानंतर एका इसमाने फिर्यादीची हॅन्डबॅग चोरी करून नेल्याचे दिसून आले. त्यानंतर गोपनीय बातमीदारांच्या मदतीने आरोपीचा शोध घेतला असता, तो उदासा येथील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले.

पोलीसांनी तातडीने शोधमोहीम राबवून **आरोपी सखाराम पांडुरंग खिल्लारे, वय ४७ वर्षे, रा. वॉर्ड क्र. ०२, उदासा** यास चोरी केलेल्या हॅन्डबॅगसह व गुन्ह्यात वापरलेल्या दुचाकीसह ताब्यात घेतले.पोलीसांनी पंचासमक्ष चोरीस गेलेले संपूर्ण दागिने व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण ९,६५,२००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा झालेल्या १६ वर्षांपासून फरार कैद्याला गुन्हे शाखेच्या पथकाने घेतले ताब्यात.
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घेतले ताब्यात.

मा. पोलीस महासंचालक, मुंबई यांच्या निर्देशानुसार राज्यभरात फरार व पाहिजे आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मौदा पोलीस स्टेशन येथे दाखल खुनाच्या गुन्हयातील मा. न्यायालयाने शिक्षा सुनावलेला १६ वर्षापासुन मिळुन येत नसलेला आरोपी **इर्शाद वहाब शेख, वय ५२ वर्ष रा. राजू नगर, हिंगणा रोड,ता जि नागपुर याचा शोध घेवुन अटक केली आहे.**

मा. न्यायालयाने नमुद आरोपीला पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत दाखल खुनाच्या गुन्हयामध्ये जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. सदर आरोपी हा सन २०१० मध्ये कारागृहातुन संचित रजेवर बाहेर आला. त्यानंतर तो परत करागृहात गेला नाही. कारागृहात परत न गेल्याने त्याचेवर कलम २२४ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. नमुद आरोपी हा मागील १६ वर्षापासुन मिळुन येत नव्हता. या विशेष मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद आरोपीचा शोध घेतला आहे. दिनांक २२/१०/२०२६ रोजी बुटीबोरी हिंगणा परीसरातुन ताब्यात घेतले पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्यास पोलीस स्टेशन मौदा यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत पोलीस स्टेशन उमरेड, देवलापार, पारशिवणी येथे खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

पोलीस स्टेशन उमरेड :— पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड आणि श्री किरण महागावे, पोउपनि, पोलीस स्टेशन उमरेड यांनी ज्योतिबा फुले, कॉलेज येथे आणि मुलांचे शासकीय वस्तीगृह, उमरेड येथे भेट देवुन सायबर जनजागृतीपर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

पोलीस स्टेशन देवलापार :— सहा. पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन देवलापार यांनी गुरुकुल प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा देवलापार येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

पोलीस स्टेशन पारिशवणी :— सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती धनश्री कुटेमाटे, पोलीस स्टेशन पारशिवणी यांनी जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळा नयाकुंड पारशिवनी येथे आणि धर्मवीर संभाजी क्रीडा मंडळ, पारशिवनी येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक , तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ 'सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.


10/22/26
12:02


सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्ग
मुलांचे शासकिय वसतीगृह, उमरेड जि.नागपू
मुलांचे शास
WELCOME




3

अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— दिनांक २२/१०/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता **आरोपी नामे घनश्याम दिनदयाल आर्मो, वय ३३ वर्ष, रा. झरीया मोहल्ला, वार्ड क्र ०३, चारगाव ततरी, नैनपुर मंडला, मध्यप्रदेश** हा न्यायालयाचें मागे खुल्या रस्त्यावर कळमेश्वर येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयास्पद रित्या गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरतांना मिळुन आला. त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर